उलटतपास शपथेवर सुरु,

उलटतपास आरोपी क्र.१,३ तर्फे वकिल आर.एम.माने वकिल

३. मी नोकरीला लागलो त्यावेळी बीकॉम झालेलो होतो. मी लोअर डिव्हीजन क्लार्क म्हणुन नोकरीस लागलो. मी सन १९९० पासुन कोल्हापुर कार्यालयात कार्यरत झालो. त्यावेळी व्ही.के.कृष्णमुर्ती हे माझे वरिष्ठ होते. त्याचे पद सहाय्यक भविष्य निधी आयुक्त होते. हे म्हणणे खरे आहे की, ज्या कंपन्या भविष्य निर्वाह निधी भरतात त्यांना भेटी देणे हे माझे कर्तव्याचा भाग होते. मी वसंतदादा सुतगिरणी ही कोणत्या बँकेतुन व्यवहार करते याची चौकशी भेट देणेपुर्वी केली नाही. जिल्हा मध्यवर्ती बँकेतुन पगाराच्या किती रकमा काढल्या त्याची पडताळणी मी केली नाही. मी जिल्हा मध्यवर्ती बँकेत जावुन किती पैसे काढले व किती कामगारांना पगार दिला याची पहाणी केली नाही. मी कोणत्या बँकेतुन पैसे काढुन कामगारांचा पगार दिला जात होता याची माहिती घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सुत गिरणीचे व्यवस्थापन संपुर्ण संचालक मंडळ बघत असते. हे म्हणणे खरे नाही की, माझे कार्यालयात हालचाल रजिस्टर असते. हे म्हणणे खरे नाही की, मी कार्यालयातुन बाहेर जाताना हालचाल नोंदवहीती नोंद करावी लागते. अधिकारी लोकांसाठी हालचाल नोंदवहीत नोंद घेण्याची अ ावश्यकता नसते. मी एखाद्या संस्थेला भेट देताना कार्यालयातील नोंदवहीत नोंद करत नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, आम्हाला कार्यालयीन आदेश असतो त्यामुळे हालचाल नोंदवहीत नोंद केलेली नसते. मी वसंतदादा सुतगिरणी या संस्थेला स्वतः भेट दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दि.२१-२-२००२ पुर्वी संस्थेला भेट दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्याद देणेपुर्वी पगारपत्रक व रिटर्न संस्थेत जावुन पाहिलेले नव्हते. मी पोलिसांना माझे वर्दीजबाबातील अ अक्षराने अधोरेखित केलेला मजकुर सांगीतलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्याद देणेपुर्वी वसंतदादा सुतगिरणी येथे गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, मी संस्थेमध्ये जावुन पगारपत्रक व मासिक रिटर्न फॉर्म नं.१२अ पाहिलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी सुतगिरणीमध्ये न गेल्यामुळे नेमके तेथे काय केले होते याची मला माहिती नाही.

४. मी फिर्याद दिल्यानंतर सुतगिरणीला भेट दिलेली होती. परंतु मला नेमकी तारीख आठवत नाही. मी सुतगिरणीला भेट दिल्यानंतर कार्यालयात अहवाल सादर केला होता. वसंतदादा सुतगिरणी ही मी भेट देणेपुर्वी किती दिवस आधीपासुन बंद होती याची मला माहिती नाही. संस्थेचे व माझे कार्यालयाचे पत्रव्यवहार झालेले होते. मी त्यापत्रव्यवहारांचे अवलोकन फिर्याद देणेपुर्वी केले होते. हे म्हणणे खरे आहे की, ती संस्था सहकारी संस्था होती. हे म्हणणे खरे आहे की, सहकारी संस्थांचे लेखापरिक्षण होत असते. मी फिर्याद देणेपुर्वी संस्थेच्या लेखापरिक्षण अहवालाची पडताळणी केली

नाही. हे मला सांगता येणार नाही की, संस्थेचे लेखापरिक्षण शासकिय लेखापरिक्षकाकडुन होत असते. मी संस्थेने पाठविलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केलेले होते. हे मला माहिती नाही की, संस्थेच्या बाळकृष्ण सुर्यवंशी यांनी सहाय्यक आयुक्त भविष्य निर्वाह निधी यांचेकडे शपथपत्र दाखल केले होते. हे मला माहित नाही की, मी फिर्याद दिली तेव्हा सुतगिरणीवर प्रशासक नेमलेला होता. हे मला आठवत नाही की, संस्थेने पाठविलेल्या कागदपत्रात ते महानगरपालिकेचे देणे लागत आहे असे कळविले होते. हे मला माहिती नाही की, संस्थेने केलेल्या पत्रव्यवहारात संस्थेने विद्युत वितरण मंडळाचे ११.०७ लाख भरले नसल्यामुळे विद्युत पुरवठा बंद केलेला आहे, असे माझे कार्यालयाला कळविलेले होते. संस्थेने त्यांची आर्थीक परिस्थीती हालाखीची असल्याने विक्रीकर देखील भरु शकलेले नाहीत असे माझे वरिष्ठांना कळविल्याचे मी पाहिलेले नाही. माझे निदर्शनास आले नाही की, सुतगिरणी ही कापुस पणन महासंघाकडुन कापुस खरेदी करते असे कळविले होते. हे मला माहित नाही की, सुतगिरणीने पत्रव्यवहार करुन त्यांना दररोज ५० ते ६० हजार तोटा होतो असे कळविलेले होते, व तो तोटा कापसाचे दर वाढल्यामुळे व सुताचा दर तोच राहिल्यामुळे होत असल्याचे कळविले होते. हे मला माहिती नाही की, सुतगिरणीने मशिनरी कमी असल्यामुळे सुत उत्पादन जेवढे पाहिजे तेवढे होत नाही असे कळविले होते. हे मला माहित नाही की, सुतगिरणीने माझे कार्यालयाला जिल्हा मध्यवर्ती बँकेने कापुस पणन महासंघाकडे दिलेली बँक गॅरंटी रद्द झालेली आहे असे कळविले होते. हे मला माहित नाही की, सुतगिरणीने कामगार जगवण्यासाठी सुतगिरणीचे कामकाज दुस-याला दिलेले आहे असे कळविलेले होते. हे मला माहित नाही की, सुतगिरणीही फक्त कामगारांचे लेबर चार्जेस देते असे कळविले होते. हे मला माहित नाही की, वीज पुरवठा बंद झाल्यामुळे केवळ कामगारांसाठी जनरेटर घेवुन सुतगिरणी चालविली आहे असे कळविले होते. हे म्हणणे खरे नाही की, सुतगिरणीतील कामगारांनी संप केला व व्यवस्थापनाला सुतगिरणीत जावु देत नसल्यामुळे सुतगिरणी बंद करण्यात आली असे कळविले होते.

५. फिर्याद दाखल केल्यानंतर मी व माझे सहकारी एन.बी.मुल्या असे वसंतदादा सुतगिरणी या संस्थेत गेलो होतो. संस्था बंद असल्यामुळे कोणालाही भेटता आले नाही. संस्था का बंद आहे याची मी चौकशी केली नाही.

प्रश्नः त्यावेळी महानगरपालिकेने संस्था सील केली होती ?

उत्तरः केली असेल.

६. मी पोलिसांना घेवुन संस्थेचे कुलुप उघडण्याचा प्रयत्न केला नाही. मी आसपासच्या लोकांकडे संस्था बंद असलेबाबत चौकशी केली नाही. मला वर्तमानपत्रातील बातमीवरुन संस्था

सील केल्याची माहिती झाली. मी माझे कार्यालयामार्फत महानगरपालिकेकडे, संस्थेची कागदपत्रे पहाणेसाठी सील काढणे विषयी पत्रव्यवहार केला होता का हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी बँकेत जावुन कागदपत्राची पडताळणी केल्यावर संस्थेने जीतका पगार काढला होता तेवढी रक्कम कामागारांना दिली होती व भविष्य निर्वाह निधीची रक्कम बँकेतुन काढली नव्हती. परंतु त्याची तरतुद केल्याचे दाखविले असे माझे निदर्शनास आले होते. हे म्हणणे खरे आहे की, वसंतदादा सुतगिरणीही सहकारी संस्था आहे. हे म्हणणे खरे नाही की, राजकीय दबाव आल्यामुळे मी खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी बँकेत जावुन कागदपत्रे पाहिलेली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मला लेखापरिक्षक अहवालावरुन कोणतीही अफरातफर झाली नाही असे निदर्शनास आले तरी जाणीवपुर्वक ही खोटी फिर्याद दिली. हे मला माहित नाही की, सुतगिरणीवरील प्रशासक व माझे वरिष्ठ यांची नंतर बैठक झालेली होती. हे म्हणणे खरे आहे की, सुतगिरणीच्या अवसायकाकडुन भविष्य निर्वाह निधी कार्यालयात १,५७,३४,१४१/- इतकी रक्कम धनादेशाद्वारे मिळालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, राजकीय दबावाला बळी पडुन मी खोटी फिर्याद दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला ही फिर्याद देण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील सर्व मजकुर खोटा सांगीतलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, कोणताही अपहार न होता मी खोटी फिर्याद दिलेली आहे.

उलटतपास आरोपी क्र.२ तर्फे वकिल एस.एस.शेठ वकिल

आरोपीच्या वकिलांना पुकारले असता गैरहजर. त्यामुळे आरोपीला स्वतः उलटतपास घेण्याची संधी दिली. आरोपीने स्वतः उलटतपास घेण्याचे नाकारले.

उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

सही/-

सांगली. ( पी.पी.केस्तीकर )

दिनांक ६/०४/२०२३. मुख्य न्यायदंडाधिकारी, सांगली.